वैद्यकीय विभाग
आवक क्र. ९८८
दिनांक: २२।४।२०१०

**मुख्यमंत्री सहाय्यता निधी मधून अर्थसहाय्य**
**शस्त्रक्रियेच्या,उपचारांचा खर्च प्रमाणित करण्याबाबत**

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन परिपत्रक क्र.मुसनि-२०१०/ प्र.क्र. ४१/ आरोग्य-६,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक :- २ मार्च, २०१०

**शासन परिपत्रक:-**

मुख्यमंत्री सहाय्यता निधी या सार्वजनिक न्यासामधून शासकीय/निमशासकीय/ धर्मादाय/ शासन मान्य रुग्णालयात उपचार व शस्त्रक्रियेसाठी रुग्णांना अर्थसहाय्य केले जाते. आता सदर निधीमधून खाजगी रुग्णालयात उपचार व शस्त्रक्रिया करण्यासाठीसुध्दा रुग्णांना अर्थसहाय्य देण्याबाबत खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आलेला आहे.

अ) खाजगी रुग्णालयातील शस्त्रक्रिया / वैद्यकीय उपचारार्थ येणारा अंदाजित खर्च रुपये एक लक्ष व त्यापेक्षा जास्त असणे आवश्यक आहे.

ब) खाजगी रुग्णालयाने नमूद केलेल्या शस्त्रक्रिया / वैद्यकीय उपचाराचा अंदाजित खर्च वाजवी असल्याबाबत मुंबई येथील खाजगी रुग्णालयांकरीता, शासकीय / महानगरपालिका रुग्णालयातील वैद्यकीय अधिक्षक वा त्यावरील दर्जाच्या वैद्यकीय अधिका-यांनी व अन्य जिल्हयाच्या ठिकाणी संबंधित जिल्हयाच्या जिल्हा शल्य चिकित्सकांनी प्रमाणित करणे आवश्यक राहील.

वरील निर्णयाप्रमाणे मुंबई येथील संबंधित शासकीय / महानगरपालिका रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिक्षक वा त्यावरील दर्जाच्या वैद्यकीय अधिका-याने व जिल्हयाच्या ठिकाणी संबंधित जिल्हा शल्य चिकित्सकांनी सदर रुग्णाच्या शस्त्रक्रिया / उपचारावरील खाजगी रुग्णालयाने नमूद केलेला खर्च वाजवी असल्याबाबत प्रमाणित

कृ.मा.प.

करणे आवश्यक आहे.

अशा प्रकरणी प्राधान्याने निर्णय घेण्यात यावा.

( अ.सं. फडतरे )
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत ,
मुख्यमंत्र्याचे प्रधान सचिव , मुख्यमंत्र्याचे सचिवालय, मंत्रालय, मुंबई
मंत्री (आरोग्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
राज्यमंत्री (आरोग्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई
आयुक्त, मुंबई महानगरपालिका, मुंबई
संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई
संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई
सर्व अधिष्ठाता , शासकीय रुग्णालये, मुंबई
कार्यकारी आरोग्य अधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका
सर्व उपसंचालक, आरोग्य सेवा परिमंडळे
सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद
सर्व जिल्हा शल्य चिकित्सक
सर्व वैद्यकीय अधिक्षक, महानगरपालिका रुग्णालये
मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष, मुख्यमंत्र्याचे सचिवालय, मंत्रालय, मुंबई
निवडनस्ती

CM Circular.lwpD:\Nilima